जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 9 NOV 2021
पुढारी

# सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी शिक्षण संस्थांचे योगदान महत्त्वाचे : मराठे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

घटनादुरुस्तीद्वारे सहकारी बँका रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली आल्या आहेत. केंद्र सरकारने सहकार मंत्रालय नव्याने स्थापन केले आहे. यामुळे येत्या काही वर्षांत सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहे. या क्षेत्रात होऊ घातलेल्या प्रगतीमध्ये शिक्षणसंस्था भरीव योगदान देऊ शकतात, असे मत भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केले.




**कोल्हापूर : विद्यापीठातील विशेष बैठकीत बोलताना भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन.**

शिवाजी विद्यापीठामध्ये वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित विशेष बैठकीत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते. मराठे म्हणाले, भारतात सहकारी संस्थांचे व्यापक जाळे असून ५ कोटी लाभार्थी आहेत. परंतु, या सर्वांचे प्रशिक्षण व प्रबोधन करण्यास प्रयत्न झाले नाहीत. प्राथमिक सहकारी संस्थांच्या संगणकीकरणामुळे नव्या पिढीला रोजगार मिळू शकतो. सहकारासाठी उपयुक्त कोर्सेस विद्यापीठाने सुरू करावेत.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सहकाराच्या यशस्वीतेसाठी प्रशिक्षण व क्षमताबांधणी गरजेची असून विद्यापीठ विविध मार्गांतून यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील यांनी याप्रसंगी आंतरविद्याशाखीय संशोधन व प्रशिक्षणाचे महत्त्व विषद केले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. अधिसभा सदस्य संजय परमणे, एस.जी. कुलकर्णी व अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. ज्ञानदेव तळुले यांनी चर्चेत सहभाग घेतला. डॉ. के. व्ही. मारूलकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. आर. के. कामत, डॉ. एम. एस. देशमुख, प्रा. डॉ. ए. एम. गुरव, प्रा. प्रकाश पवार, दिनेश जंगम, नंदकुमार दिवटे आदी उपस्थित होते.

09 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रेस टू झिरो' मोहिमेत कोल्हापूरचा समावेश

## २०५० पर्यंत शहरातील कार्बन उत्सर्जन शून्यावर येणार; एमपीसीबीला आराखडा तयार करण्याच्या सूचना

कोल्हापूर : आशिष शिंदे

पुढारी विशेष

कार्बन उत्सर्जनाच्या वाढत्या प्रमाणामुळे हवामान बदलाचे गंभीर संकट जगासमोर उभे आहे. या संकटावर मात करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने जागतिक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या 'रेस टू झिरो' मोहिमेत कोल्हापूर शहराचा समावेश करण्यात आला आहे. या मोहिमेंतर्गत २०५० पर्यंत शहर कार्बनमुक्त करण्यात येणार आहे.

संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने राबण्यात येत असलेल्या रेस टू झिरो मोहिमेत राज्य शासनाने राज्यातील ४३ शहरांचा सहभाग नोंदवला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने या शहरांमधील कार्बन उत्सर्जन २०३० पर्यंत निम्म्यावर आणण्याचे उद्दिष्ट आहे.

४३ शहरांमधील कार्बन उत्सर्जनाच्या परिस्थितीची माहिती घेऊन खासगी संस्थेद्वारे ऑडिट करण्यात येणार आहे. याकरिता एमपीसीबीच्या वतीने निविदा काढण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याअंतर्गत प्रथम शहरातील कार्बन उत्सर्जनाच्या स्रोतांची यादी तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी कृती आराखडा तयार केला जाणार आहे.

> शहरांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात वाढणाऱ्या वाहनांच्या संख्येमुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण वाढत आहे. याशिवाय ओद्योगिक क्षेत्रांमध्ये इको फ्रेंडली स्रोतांचा वापर करण्यावर भर देणे गरजेचे आहे. तसेच शहरामध्ये व शहराभोवती ग्रीन बेल्ट विकसित करणे महत्त्वाचे आहे. कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्यासाठी छोटी-छोटी पावले उचलत मोठे बदल घडवणे शक्य आहे.
>
> **- डॉ. आसावरी जाधव**, पर्यावरण विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ

| कोल्हापूरमध्ये दररोज अन्न शिजवण्यासाठी होणाऱ्या स्रोतांचा वापर (आकडे किलोमध्ये) | |
|---|---|
| जळाऊ लाकूड | 67900 |
| पिकांचे अवशेष | 10971 |
| शेणी | 58750 |
| कोळसा | 850 |
| रॉकेल | 561 |
| एलपीजी | 125595 |




| वाहनांमधून होणारे कार्बन उत्सर्जन (प्रति किलोमीटर/किलो) | |
|---|---|
| 110 सीसी स्कूटर | 0.0334 |
| 125 सीसी मोटारसायकल | 0.0290 |
| 800 सीसी पेट्रोल चारचाकी | 0.103 |
| 800 सीसी सीएनजी चारचाकी | 0.063 |
| 1000 सीसी डिझेल चारचाकी | 0.105 |

कार्बन उत्सर्जनामुळे जागतिक तापमानात विघातक व अनिश्चित असे बदल घडून येत आहेत. याचे गंभीर परिणाम मानवी जीवनावरही होत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या एका अहवालानुसार दररोज केवळ विद्यापीठ परिसरामध्ये येणाऱ्या वाहनांमुळे दरवर्षी सुमारे ३७ हजार ३२५.२३ किलो कार्बन उत्सर्जन होते. यावरून शहरातील दुचाकी व चारचाकी वाहनांमधून होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाची तीव्रता समजू शकते.

शिवाजी विद्यापीठामध्ये प्रतिवर्षी सुमारे ३ हजार ३२४.२ किलो एलपीजी गॅसचा वापर होतो. यामधून दरवर्षी सुमारे ९ हजार ९१६.०९ किलो तर, दरवर्षी सुमारे ३४ हजार ४८०.२५१ मेगावॅट विजेचा वापर होतो. यामधून प्रतिवर्षी २ कोटी ९३ लाख ८ हजार २१३.३५ कार्बन उत्सर्जन होते. यावरून शहरातील कार्बन उत्सर्जनाची तीव्रता लक्षात येते.

तरुण भारत

# विद्यापीठ सेमिस्टर पूर्वीप्रमाणे चार महिन्यांचीच

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी आणि पदव्युत्तरचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी पूर्वीप्रमाणेच चार महिन्याचा कालावधी मिळणार आहे. दरवर्षी जूनमध्ये सुरू होणारी सेमिस्टर कोरोनामुळे ऑक्टोबरमध्ये सुरू झाली आहे. तर फेब्रुवारीमध्ये ही सेमिस्टर संपणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुट्ट्या कमी केल्या आहेत. त्यामुळे युजीसीच्या नियमानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी २५२ तास तर पदवी अभ्यासक्रमासाठी २४० तास मिळतात. परिणामी सध्याच्या सेमिस्टरला नियमाप्रमाणे ९० दिवस अभ्यासक्रम पूर्ण मिळण्यासाठी मिळत आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.